रविवार, २७ फेब्रुवारी २०२२

# राम प्रहर

◆ वर्ष १४ ◆ अंक २२१
www.ramprahar.com

◆ पाने ६ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## युक्रेनमध्ये अडकलेल्या भारतीयांना घेऊन विमान मायदेशी



**मुंबई :** युद्धग्रस्त युक्रेनमध्ये अडकलेल्या २१९ भारतीयांना घेऊन रवाना झालेले एअर इंडियाचे पहिले विमान शनिवारी (दि. २६) रात्री मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर दाखल झाले. या विमानाने दुपारी रोमानियाची राजधानी बुचारेस्ट येथून भारतासाठी उड्डाण केले होते. रशियन हल्ल्यानंतर युक्रेनमध्ये मोठ्या प्रमाणात भारतीय नागरिक अडकले आहेत. यामध्ये विद्यार्थ्यांची संख्या सर्वाधिक आहे. त्यांची सुखरूप सुटका व्हावी यासाठी मोदी सरकार प्रयत्नशील असून युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत. युक्रेनमध्ये अडकलेल्या भारतीयांना रस्तेमार्गाने रोमानिया आणि हंगेरीत आणण्यात आले असून तेथून विमानाने मायदेशी परत आणण्याची प्रक्रिया सुरू आहे.

## अंतरंग

संपकरी एसटी कर्मचाऱ्यांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप/२

अर्थविषयक घडामोडींचा वेध घेणारे सदर अर्थप्रहर/४

मार्च महिन्यात रंगणार रायगड क्रिकेट चॅम्पियन्स लीग/६

### मराठा आरक्षणासाठी संभाजीराजेंचे आमरण उपोषण

# मुख्यमंत्र्यांसह मविआ सरकारवर टीका

**मुंबई : प्रतिनिधी**

गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर खासदार संभाजीराजे भोसले आक्रमक झाले असून त्यांनी शनिवार (दि. २६)पासून मुंबईच्या आझाद मैदानात आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे. या वेळी त्यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र सरकारवर तीव्र शब्दांत निशाणा साधला.



काही दिवसांपूर्वी संभाजीराजेंनी उपोषणासंदर्भात घोषणा केली होती. त्यानुसार ते उपोषणाला बसले आहेत. उपोषण सुरू करताना संभाजीराजे म्हणाले की, सगळ्यांना एका छताखाली कसे आणता येईल या दृष्टीने हा लढा आहे. माझा लढा ३० टक्के श्रीमंत मराठ्यांसाठी नसून गरीब मराठ्यांसाठी आहे. त्यांच्या आरक्षणासोबत इतर प्रलंबित मागण्यांसाठी हा लढा आहे.

मी २००७पासून महाराष्ट्र फिरतोय. मी आजच टपकलो नाहीये. छत्रपती शिवाजी महाराजांचा वंशज या नात्याने मी महाराष्ट्र पिंजून काढला. यातून आम्ही आरक्षण समाजाला का गरजेचे आहे याची जनजागृती केली होती. २०१३मध्ये मी महाराष्ट्रात फिरत असताना मराठा समाजाच्या संघटनांनी एकत्र येऊन सांगितले की, राजे तुम्ही नेतृत्व करणे गरजेचे आहे. त्यामुळेच २०१३मध्ये आझाद मैदानात आम्ही मोर्चा काढला होता, असे त्यांनी सांगितले.

मराठा आरक्षणाच्या मागण्यांसाठी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी स्वतंत्र मागासवर्ग आयोगाची घोषणा शुक्रवारी केली. या संदर्भात विचारणा केली असता संभाजीराजे यांनी त्यावर निशाणा साधला. एक मागासवर्ग आयोग असताना फक्त मराठा समाजासाठी वेगळा आयोग तयार करता येतो का? हा प्रश्न आहे. फक्त मराठा समाजाला खूश करण्यासाठी असे वक्तव्य येता कामा नये. माझ्या माहितीनुसार हे कायदेशीर नाही, असे ते म्हणाले.

तुम्ही या अर्थसंकल्पात आमच्या मागण्यांसदर्भात तरतूद करा. ब्लू प्रिंट दाखवा. आर्थिक नियोजन सांगा. तुमच्या हातात ज्या गोष्टी आहेत त्या करा, अशी मागणी या वेळी संभाजीराजेंनी केली.



(छाया : लक्ष्मण ठाकूर) अधिक छायाचित्रे पान ६ वर..

# देवद, वांगणी तर्फे वाजेत विकासकामांचे भूमिपूजन

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शुभारंभ



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल विधानसभा मतदारसंघात विकासाची विविध कामे सुरू आहेत. त्यालाच अनुसरून देवद आणि वांगणी तर्फे वाजे ग्रामपंचायत हद्दीतही विकासकामे करण्यात येत असून त्याचे भूमिपूजन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी (दि. २६) झाले.

पनवेल तालुक्यातील देवद ग्रामपंचायत परिसरात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या निधीतून मोरी क्रमांक १ ते नरेश वाघमारे यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रिटीकरण, जि. प. शाळा दुरुस्ती करणे, ग्रामपंचायत निधीमधून त्रिमूर्ती श्लोक सोसायटी ते स्क्वेअर रेसिडेन्सीपर्यंत रस्ता काँक्रिटीकरण करणे, १५व्या वित्त आयोगातून मुख्य पाणीपुरवठा पाइपलाइन ग्रामपंचायतीकरिता स्वतंत्र करणे, खुली व्यायामशाळा तयार करणे आणि १४व्या वित्त आयोगातून मैत्री सोसायटी ते दत्तनाथ आंगन सोसायटीपर्यंत ड्रेनेज लाईन टाकण्याचे काम करण्यात येत आहे. या विकासकामांचे भूमिपूजन आमदार प्रशांत ठाकूर व अन्य मान्यवरांच्या हस्ते झाले.

याचबरोबर वांगणी तर्फे वाजे ग्रामपंचायत हद्दीतील वांगणी आणि आदिवासावाडीत केंद्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी जलमिशन अंतर्गत आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नांमुळे नळ पाणीपुरवठा योजना राबविण्यात येत आहे. ३४ लाख २६ हजार ५०० रुपयांचा निधी वापरून होणाऱ्या या कामाचा शुभारंभ आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाला. **(पान २ वर..)**



**सातारा :** रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी महाविद्यालयात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी 'कमवा आणि शिका' या योजनेतून शिक्षण घेतले. त्या वेळी मराठीचे शिक्षक म्हणून मा. के. यादव यांचे त्यांना मौल्यवान मार्गदर्शन लाभले. 'रयत'चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य असलेले लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शनिवारी सातारा येथे यादव यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट देऊन छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचे माजी प्राचार्य मा. के. यादव सर आणि त्यांच्या सुविद्य पत्नी कमल यादव यांचा सत्कार केला. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासोबत वसतिगृहात सहकारी राहिलेले दिनकर झिंब्रे तसेच यादव कुटुंबीय उपस्थित होते.

## महाडमध्ये अपघातात तिघे ठार, दोन जण जखमी

**महाड : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावर महाड तालुक्यातील दासगाव येथे शनिवारी (दि. २६) मध्यरात्री बलेनो कारची बसला धडक बसून तिघांचा मृत्यू आणि दोन जण जखमी झाले आहेत.

मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या बलेनो कारने (एमएच ०५-डीएस ६८६१) समोरून येणाऱ्या बसला (एमएच ४८-बीएम ६२९९) धडक दिली. या अपघातात कारमधील संदीप सीताराम पाटील (४०, ठाणे) यांचा जागीच, तर अनिल दत्ताराम राणे (४५) व साधना निलेश राऊत (४५, मुंबई) यांचा रुग्णालयात नेताना मृत्यू झाला. कारचालक दीपक सीताराम पाटील व सुगंधा सीताराम पाटील (ठाणे) गंभीर जखमी झाले आहेत.



# राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष अशोक गावडेंकडून अमृता फडणवीस यांच्याबद्दल आक्षेपार्ह विधान

## भाजप महिला मोर्चाकडून पोलिसांत तक्रार

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

माजी मुख्यमंत्री व विधानसभा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांची पत्नी अमृता फडणवीस यांच्याबद्दल वाशी येथील आंदोलनात राष्ट्रवादी काँग्रेसचे नवी मुंबई जिल्हा अध्यक्ष अशोक गावडे यांनी आक्षेपार्ह विधान केल्याबद्दल भारतीय जनता पक्ष संतप्त झाला आहे. या प्रकरणी भाजप महिला मोर्चा अध्यक्ष दुर्गा डोख यांनी वाशी पोलिसांत तक्रार दिली असून गावडेंनी स्त्रीचा अपमान करणारे व्यक्तव्य केल्याचे दिसून आल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे.

माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची पत्नी अमृता फडणवीस यांचा अपमान करण्याच्या उद्देशाने आक्षेपार्ह विधान राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हाध्यक्षांनी केल्याचा आरोप बेलापूरच्या आमदार मंदाताई म्हात्रे यांनी शनिवारी (दि. २६) पत्रकार परिषदेत बोलताना केला. अशोक गावडे यांना नवी मुंबई पोलिसांनी त्वरित अटक करावी, अशी मागणीही आमदार



म्हात्रे यांनी या वेळी केली.

राज्यातील महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते आणि अल्पसंख्याकमंत्री नवाब मलिक यांना मनी लॉण्डरिंग प्रकरणात सक्तवसुली संचालनालय (ईडी) तपास यंत्रणेने अटक केली असून त्यांना ३ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या पार्श्वभूमीवर नवी मुंबईतील महाविकास आघाडीने वाशी येथील छत्रपती शिवाजी चौकात २५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी आंदोलन केले होते. या आंदोलनात राष्ट्रवादी काँग्रेसचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष अशोक गावडे यांनी राज्याचे माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची पत्नी अमृता फडणवीस यांच्यावर आक्षेपार्ह टीका केल्याचा आरोप आमदार मंदाताई म्हात्रे यांनी केला आहे.

या संदर्भात नवी मुंबई भाजपच्या वतीने पोलीस आयुक्त बिपीनकुमार सिंग यांना निवेदन देण्यात आले. वाशी येथील पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. पोलिसांनी अशोक गावडे यांच्यावर गुन्हा दाखल करून त्यांना त्वरित अटक करण्यात यावी, अशी मागणी आमदार म्हात्रे यांनी केली आहे. या वेळी भाजप नवी मुंबई महामंत्री डॉ. राजेश पाटील, विजय घाटे, भाजप नवी मुंबई युवती अध्यक्ष सुहासिनी नायडू, सुभाष गायकवाड,पांडुरंग आमले आदी उपस्थित होते. दरम्यान, गावडेंनी आरोपाचा इन्कार केला आहे.

# अत्याधुनिक एसआरएल डायनॉस्टीक सेंटर पनवेलकरांसाठी सोयींयुक्त

## आमदार प्रशांत ठाकूर यांचे प्रतिपादन

**पनवेल : वार्ताहर**

अत्याधुनिक सोयींयुक्त असे एसआरएल डायनॉस्टीक सेंटर हे पनवेलकरांच्या सेवेसाठी शनिवार (दि. २६) पासून सुरू झाले आहे. याच्या उद्घाटनानिमित्त त्यांनी सर्वांसाठी मोफत, रक्ततपासणी व मोफत नेत्र तपासणी हा उपक्रम राबवला हे कौतुकस्पद असल्याचे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी उद्घाटनावेळी केले.

उद्घाटन समारंभास नगरसेविका दर्शना भोईर, डॉ. माला झाला, रविकांत झाला, डॉ. निलेश बांठिया, एसएलआरचे अंकित कुमार सिंग, अनिकेत मोहिते, निलेश कोळी, सचिन नाफाडे आदी उपस्थित होते.



डायनॉस्टीक सेंटर हे पनवेल मिडलक्लास हौसिंग सोसायटी, एमटीएनएलसमोर गुरूकृपा अपार्टमेंट येथे शॉप नं. ८, प्लॉट नं. १२३वर आहे. या ठिकाणी विविध प्रकारच्या रक्त तपासणी, त्यामध्ये प्रामुख्याने मलमूत्र तपासणी तसेच इतर तपासणी व चाचण्या माफक दरात केल्या जाणार आहेत. यानिमित्ताने रविवारी (दि. २७) सकाळी ८ ते १ वाजेपर्यंत मोफत रक्त तपासणी व नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन विविध मान्यवर डॉक्टरांच्या उपस्थितीत करण्यात आले आहे. याचा लाभ पनवेलकरांनी घ्यावा, असे आवाहन लॅब डायरेक्टर जसोल सुभाषचंद्र बांठिया (८८२८८८२६२६) यांनी केले आहे.

## स्वातंत्र्यवीर सावरकरांना अभिवादन



**पनवेल : क्रांतिकारकांचे प्रेरणास्थान स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची पुण्यतिथी शनिवारी होती. यानिमित्त भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि सभागृह नेते परेश ठाकूर यांनी शहरातील स्वातंत्र्यवीर सावरकर चौकात असलेल्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या वेळी भाजपचे शहर अध्यक्ष जयंत पगडे, स्थायी समिती सभापती नरेश ठाकूर, प्रभाग समिती ड सभापती वृषाली वाघमारे, नगरसेवक अनिल भगत, नगरसेविका दर्शना भोईर, रूचिता लोंढे, प्रभाग क्रमांक १९चे अध्यक्ष पवन सोनी, ॲड. जितेंद्र वाघमारे आदी उपस्थित होते.**





# पनवेल महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांचा पाहणी दौरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या माध्यमातून महापालिका क्षेत्रातील विविध समस्या सोडवण्यासाठी पाहणी दौरा सुरू आहे. त्या अंतर्गत त्यांनी शनिवारी (दि. २६) प्रभाग क्रमांक १९ आणि २०मध्ये रस्ते आणि गटारांची पाहणी केली तसेच सुरू असलेल्या कामांचा आढावा घेऊन अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या.

पनवेल शहरातील पटेल हॉस्पिटल, भाजी मार्केट परिसर, म्हात्रे हॉस्पिटल, तक्का, भिंगारी या परिसरातील रस्ते आणि गटारांची सभागृह नेते परेश ठाकूर यांनी पाहणी केली. या ठिकाणी सुरू असलेल्या कामांचा त्यांनी लोकप्रतिनीधी आणि महापालिकेच्या अधिकाऱ्यांसोबत पाहणी करून आढावा घेतला आणि त्यांना आवश्यक सूचना दिल्या.

या वेळी भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे, स्थायी समिती सभापती नरेश ठाकूर, प्रभाग समिती ड सभापती वृषाली वाघमारे, नगरसेवक अनिल भगत, राजू सोनी, तेजस कांडपिळे, अजय बहिरा, नगरसेविका चारुशीला घरत, दर्शना भोईर, रूचिता लोंढे, प्रभाग क्रमांक १९चे अध्यक्ष पवन सोनी, भाजप नेते ॲड. जितेंद्र वाघमारे, युवा नेते प्रतिक बहिरा, माजी नगरसेवक प्रभाकर बहिरा, वॉर्ड क्रमांक २० अध्यक्ष रघुनाथ बहिरा, शहर अभियंता संजय कटेकर, उपअभियंता साळुंखे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# भाजप नेत्यांच्या नियुक्त्या

**मुंबई : प्रतिनिधी**

भाजप प्रदेश सरचिटणीस आमदार रवींद्र चव्हाण, विधान परिषद विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर आणि प्रदेश उपाध्यक्ष आमदार प्रसाद लाड यांना पक्षाकडून विशेष जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत. भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी त्यांच्या पदांवर नियुक्त्या केल्या आहेत.

आमदार रवींद्र चव्हाण यांची कोकण विभाग प्रमुख, विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांची एमएमआरडीए क्षेत्र प्रमुख (मुंबई महानगर वगळून) आणि आमदार प्रसाद लाड यांची रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

आपल्या अनुभवाचा उपयोग पक्ष संघटन वाढविण्यासाठी निश्चितपणे होईल याचा मला पूर्ण विश्वास आहे, असे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी म्हटले आहे.



**पनवेल : असंघटित कामगारांना सामाजिक सुरक्षा आणि कल्याणकारी योजनांचा लाभ मिळावा यासाठी भाजप कामोठे मंडलच्या वतीने दोन दिवसीय मोफत ई-श्रम महानोंदणी अभियान राबविण्यात आले. भाजपच्या कामोठे येथील कार्यालयात झालेल्या या अभियानाला महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांनी शनिवारी भेट दिली. या वेळी भाजप कामोठे शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, युवा मोर्चा शहर अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, नगरसेविका संतोषी तुपे, महिला मोर्चा शहर अध्यक्ष वनिता पाटील आदी उपस्थित होते.**



# संपकरी एसटी कर्मचाऱ्यांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

एसटी कर्मचाऱ्यांचा विलगीकरणाचा लढा सुरू आहे. या लढ्यात पनवेल बस आगारातील कर्मचारी सहभागी असून त्यांचे काम बंद आंदोलन सुरू आहे. दरम्यान या कर्मचाऱ्यांवर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे. त्या पार्श्वभूमीवर श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि पनवेल महापालिकेच्या उपमहापौर सीताताई पाटील यांनी या कर्मचाऱ्यांना जीवनावश्यक वस्तूंचे शनिवारी (दि. २६) वाटप केले.

सामाजिक उपक्रम राबविण्यात नेहमी अग्रेसर असलेल्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने आणि पनवेल महापालिकेच्या उपमहापौर सीताताई पाटील यांच्या पुढाकाराने पनवेल आगारात आंदोलनाला बसलेल्या एसटी कर्मचाऱ्यांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप केले. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते सदानंद पाटील, हरिदास वनवे, विश्वास काथारा, संदीप डोंगरे आदी उपस्थित होते.

## दुखवटा

### निर्मला बडेकर

**मोहोपाडा :** वाशिवली येथील निर्मला दामोदर बडेकर यांचे निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात पती, दीर, जावा, सुना, मुले, नातवंडे, पातवंडे असा मोठा परिवार आहे. कै. निर्मला बडेकर यांचे उत्तरकार्य शुक्रवारी (दि. २५) घरी होणार असून हभप हरिश्चंद्र महाराज जाधव यांच्या प्रवचनाचा कार्यक्रम होणार आहे.

### लीलावती फके

**पनवेल :** तक्का येथील लीलावती यशवंत फके यांचे नुकतचे निधन झाले आहे. त्या ८१ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात पाच मुले, सुना व नातू, पतवंडे असा मोठा परिवार आहे. कै. फके यांचा दशक्रिया विधी मंगळवारी (दि. १ मार्च) व उत्तरकार्य शुक्रवारी (दि. ४ मार्च) होणार आहे.

### सीताराम गायकवाड

**कर्जत :** तालुक्यातील सहकार क्षेत्रातील कार्यकर्ते आणि आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते सीताराम गायकवाड यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. कर्जत तालुका भारतीय बौद्ध महासभेचे कर्जत तालुका अध्यक्ष म्हणून त्यांनी काम केले होते. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.



**पनवेल : आकुर्ली येथील भाजप युवा नेते संतोष सदानंद पाटील यांना वाढदिवसानिमित्त जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, सुकापूर विभागीय अध्यक्ष राजेश पाटील, वाहतूक सेल तालुका सहसंयोजक रोशन पाटील यांनी शुभेच्छा दिल्या.**



**पनवेल : भाजप लक्ष्मी वसाहतीमधील बूथ अध्यक्ष लखन जाधव यांचा वाढदिवस शनिवारी साजरा झाला. महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांनी जाधव यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी संतोष ढगे, मनीष निपाणीकर, अमोल लहाने, अर्जुन मातंगी, महेश अलविनकर उपस्थित होते.**

पान १ वरून

## देवद, वांगणी तर्फे वाजेत विकासकामांचे भूमिपूजन

या कार्यक्रमांना भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, जि. प. सदस्य अमित जाधव, देवद ग्रामपंचायतीच्या सरपंच शितल सोनावणे, सदस्य विनोद वाघमारे, दिनेश वाघमारे, निलेश जुवेकर, वांगणी तर्फे वाजे ग्रामपंचायतीच्या सरपंच सुरेखा पवार, उपसरपंच अक्षता म्हात्रे, भाजपचे वामन वाघमारे, कैलास वाघमारे, राम वाघमारे, अरुण वाघमारे, उत्तर वाघमारे, रामा वाघमारे, ज्ञानोबा कांबळे, भगवान भंडारी, किशोर सुरते, गणेश वाघमारे, अनंता वाघमारे, नामदेव पाटील, पद्माकर वाघमारे, प्रवीण वाघमारे, नितीन वाघमारे, गोविंद पाटील, गणा वाघमारे, श्याम वाघमारे, जयेश वाघमारे, डॉ. कृष्णा देसाई, जितकुमार सिंग, एस. टी. मेटकरी, योगेश पाटील, चक्रपाणी म्हात्रे, संतोष शेळके, किशोर सुरते, सतिश मालुसरे, महेंद्र भोईर, प्रवीण म्हात्रे, प्रवीण पाटील, संतोष पाटील, हरिश्चंद्र भालेकर, निवृत्ती मालुसरे, बळीशेठ मालुसरे, लहू जळे, एकनाथ शिंदे, गणेश पाटील, एकनाथ कडव, संतोष घरत, अप्पा पाटील, गणपत शेळके, भगवान कातकरी, सुवर्णा पाटील, संपदा पालव, लीलाबाई कातकरी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.

# मराठी भाषेचा वारसा जपा -प्राचार्य इंदुमती घरत

## ■ सीकेटी विद्यालय व 'कोमसाप'तर्फे मराठी भाषा दिन साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मराठी भाषा गोड आहे. तिची भुरळ अनेक अमराठी माणसांनाही पडली आहे. त्यामुळे आपल्या मातृभाषेचा वारसा आपण जपला पाहिजे, असे मत चांगू काना ठाकूर (सीकेटी) माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्य इंदुमती घरत यांनी शनिवारी (दि. २६) नवीन पनवेल येथे सोहळ्यात व्यक्त केले.

नवीन पनवेल येथील सीकेटी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय व कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा दिन साजरा करण्यात आला. या सोहळ्याचे उद्घाटन कोमसापच्या नवीन पनवेल शाखेचे अध्यक्ष गणेश कोळी व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते झाले. सुप्रसिद्ध साहित्यिक कुसुमाग्रज यांची प्रतिमा आणि त्यांच्या पुस्तकांचे पालखीत पूजन केल्यानंतर शाळेच्या मुख्य द्वारापासून पालखी काढण्यात आली. या पालखीबरोबर शाळेच्या विद्यार्थी-विद्यार्थिनी पारंपरिक वेषभूषेत सहभागी झाले होते.

कोमसाप नवीन पनवेल शाखेचे अध्यक्ष गणेश कोळी यांनी आपल्या भाषणात, प्रत्येकाला मातृभाषेचा अभिमान आहे. ही मातृभाषा लोप पावू नये म्हणून तिचा प्रचार आणि प्रसार झाला पाहिजे. याची सुरुवात प्रत्येकाने आपल्या घरापासून



केली तर तिचा विस्तार होईल. देशातील अनेक राज्यांमध्ये त्यांच्या असणाऱ्या मातृभाषेला मोठ्या प्रमाणात महत्त्व आहे, त्याचप्रमाणे महाराष्ट्रातही मराठी भाषेला महत्त्व दिले गेले पाहिजे, असे सांगितले.

या कार्यक्रमाला जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, उपाध्यक्ष वाय. टी. देशमुख आणि संस्थेचे सचिव डॉ. एस. टी गडदे यांनी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमास कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेच्या ज्येष्ठ गझलकार ज्योत्स्ना राजपूत, सुनिता रामचंद्र, स्मिता गांधी, रामदास गायधने, गणेश म्हात्रे, योगिनी वैदू, रमेश भोळे, सुमंत नलावडे, चित्रलेखा जाधव, विलास पुंडले, अनिल दाभाडे तसेच सीकेटी विद्यालयाच्या इंग्रजी विभागाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, सीकेटी विद्यालय इंग्रजी माध्यमाच्या मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, पूर्व प्राथमिक इंग्रजी माध्यमाच्या मुख्याध्यापिका संध्या अय्यर, पर्यवेक्षक कैलास म्हात्रे, अजित सोनवणे प्रशांत मोरे,अनुराधा कोल्हे उपस्थित होते.

या वेळी विज्ञान रांगोळी प्रदर्शनाचे तसेच ज्युनियर कॉलेजच्या भित्तीपत्रिकचे उद्घाटन आणि लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या जीवनावरील हस्तलिखित पुस्तिकेचे प्रकाशन गणेश कोळी यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे सुरुवातीला मराठी भाषा दिनानिमित्त श्रावणी हजारे हिने गीत गायले तसेच वेदांत शिंदे याने भाषण केले. सूत्रसंचालन स्वाती पाटील, सारिका दिवेकर,सुवर्णा शिर्के यांनी केले.

# रूपे कार्डचा प्रवास आणखी वेगवान!

**रूपे डेबिट कार्डचा वापर देशात वेगाने वाढला, मात्र नंतर आलेल्या रूपे क्रेडीट कार्डचा वापर या वेगाने वाढण्यास मर्यादा आहेत. व्हिसा आणि मास्टरकार्ड या कंपन्यांची मक्तेदारी डेबिट कार्ड व्यवसायात मोडून काढण्याचे काम रूपेने केले आहे. सरकार आणि रिझर्व्ह बँक या देशी कार्डच्यामागे खंबीरपणे उभी असल्याने रूपे क्रेडीट कार्डचा वापरही नजीकच्या भविष्यात वाढेल यात शंका नाही.**

अर्थ प्रहर

यमाजी मालकर
(ymalkar@gmail.com)

नॅशनल पेमेंटस कार्पोरेशन ऑफ इंडियाने (एनपीसीए) २०१३ म्हणजे आठ वर्षांपूर्वी रूपे कार्ड पद्धत सुरू केली तेव्हा विदेशी कार्ड पद्धतीला देशी पर्याय देण्याचा उद्देश होता हे उघड आहे, पण त्यातील १०० टक्के तंत्रज्ञान भारतीय नव्हते. आता मात्र त्या तंत्रज्ञानात एनपीसीएने मोठी मजल मारली असून आठ वर्षांत रूपे कार्डने देशातील तब्बल ३५ टक्के बाजार हिस्सा मिळविला आहे. सध्या आत्मनिर्भर धोरणांतर्गत अनेक क्षेत्रांत भारतीय पर्यायांना सरकार बळ देते आहे. आर्थिक क्षेत्रात रूपे कार्डचा प्रवास हे अशाच आत्मनिर्भर धोरणाचे देशाने मिळविलेले यश म्हणता येईल.

व्हिसा आणि मास्टरकार्ड यांची एकेकाळी मक्तेदारी होती. त्यामुळे याआंतरराष्ट्रीय कंपन्या त्याचा गैरफायदाही घेत होत्या, पण आता रूपे कार्डच्या पर्यायामुळे मक्तेदारी तर कमी झालीच, पण वाढत्या स्पर्धेत भारतीय ग्राहकांचाही फायदा होतो आहे. रूपे कार्डचे स्वरूप पूर्वी प्रामुख्याने डेबिट कार्ड होते, पण आता म्हणजे २०१७पासून क्रेडीट कार्ड क्षेत्रातही त्याने प्रवेश केला असून आता कार्ड क्षेत्रात खरी स्पर्धा सुरू झाली आहे. रूपे क्रेडीट कार्डची संख्या सध्या १५ लाखपेक्षा अधिक आहे. याचा अर्थ एकूण क्रेडीट कार्डची एकूण संख्या ६.९ कोटी असताना हा हिस्सा अगदीच कमी आहे. भारतीय बाजारात सध्या व्हिसाचा हिस्सा ६३ टक्के, मास्टरकार्डचा ३२ टक्के आणि अमेरिकन एक्स्प्रेसचा दोन ते तीन टक्के आहे. रूपे क्रेडीट कार्डचा हिस्सा या आर्थिक वर्षांच्या अखेरीस दोन टक्के तरी व्हावा आणि त्यापुढील आर्थिक वर्षात तो आणखी दुपटीने वाढावा, असे प्रयत्न केले जात आहेत.

सरकारने गेल्या डिसेंबरमध्ये युनायटेड पेमेंट इंटरफेस (युपीआय) आणि रूपे डेबिट कार्डचा वापर वाढावा म्हणून १३०० कोटी रुपयांची विशेष तरतूद केली आहे. सरकार सार्वजनिक बँकांच्या मदतीने हा बदल वेगाने घडवून आणू इच्छिते. ज्या बँका याद्वारे अधिकाधिक व्यवहार करतील त्यांना सरकार हा पैसा देते. कार्डचा वापर देशात वाढत चालल्याने त्यात देशी पर्याय उपलब्ध करून देणे ही चांगलीच गोष्ट आहे, मात्र अजून रूपे कार्डला मोठा पल्ला गाठायचा आहे. सध्या ९४ कोटी डेबिट कार्डमध्ये रूपे डेबिट कार्डची संख्या ६० कोटी इतकी आहे. याचा अर्थ रूपे कार्डवर मिळणारे फायदे जसजसे नागरिकांच्या लक्षात येतील तसतसा त्याचा वापर वाढत जाईल. अर्थात, हा प्रवास काही सोपा नाही, कारण व्हिसा आणि मास्टरकार्ड कंपन्यांना सरकारचा हा हस्तक्षेप मान्य नसून ते याविषयी अमेरिकी सरकारकडे तक्रार करताना दिसत आहेत. जनहिताच्या एखाद्या योजनेमागे सरकार ठामपणे उभे राहिले तर काय होऊ शकते याची चुणूक रूपे कार्डच्या वेगवान प्रसारात दिसून आली आहे. रूपे कार्डच्या प्रसारात भारतातील सर्वसामान्य माणसाची ताकद ठळकपणे दिसली आहे. भारताने लोकसंख्येचा बोनस घेतला पाहिजे, असे जे नेहमी म्हटले जाते तो बोनस घेतला गेला तर किती चांगला बदल होऊ शकतो, हेही रूपे कार्डच्या या प्रसाराच्या निमित्ताने समोर आले आहे. नोटबंदीसारखे देशाच्या स्वभावातील बदल सर्वसामान्य नागरिक किती चांगल्या पद्धतीने स्वीकारत आहेत, हेही रूपे कार्ड वापरणाऱ्यांची वाढती संख्या अधोरेखित करते.

२०१५च्या दिल्लीत झालेल्या आर्थिक परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रूपे कार्डच्या वापरावर जोर दिला आणि रूपे कार्डच्या प्रसाराच्या अनेक योजना जाहीर केल्या. तेव्हापासून रूपे कार्डने आंतरराष्ट्रीय कार्ड कंपन्यांच्या नाकात दम आणला आहे. तब्बल अकराशे भारतीय बँका रूपे कार्डचे वितरण करतात. रूपे कार्डच्या मागे सरकार ठामपणे उभे राहिल्यानेच हे शक्य झाले. उदा. २००९ला रिझर्व बँकेने इंडियन बँक्स असोसिएशनला असे एखादे कार्ड काढण्यास सांगितले आणि तसे 'इंडिया कार्ड' २०१२ ला अस्तित्वातही आले, पण २०१३ला रूपे कार्डचा बाजारातील हिस्सा होता फक्त ०.६ टक्के, पण जेव्हा आर्थिक सामिलीकरणासाठी जनधन योजना लागू करण्यात आली (२०१४), तेव्हा अशा सर्व खातेधारकांना रूपे कार्ड देण्याच्या सूचना सरकारने दिल्या आणि रूपे कार्डची दमदार वाटचाल सुरू झाली. २०१७-१८ या वर्षात पॉइंट ऑफ सेल मशीनवर रूपे कार्डचा होणारा वापर त्या पूर्वीच्या वर्षाच्या तुलनेत १३५ टक्के वाढला आणि तो ४५.९ कोटी व्यवहारांपर्यंत पोहचला होता. केवळ पॉइंट ऑफ सेल मशीनवरच नव्हे तर ई-कॉमर्स साईटवरही हा वापर वाढल्याचे दिसते आहे. जनधन खातेधारकांकडेच रूपे कार्ड जास्त आहेत. त्यामुळे त्यावर असे किती व्यवहार होणार अशी शंका घेतली जाऊ शकते, पण आकडेवारी असे सांगते की, २०१७ला रूपे कार्डच्या माध्यमातून केवळ पाच हजार ९३४ कोटी रुपयांचे व्यवहार झाले होते, ते २०१८मध्ये १६ हजार ६०० कोटींवर पोहचले आहेत. ही वाढ १८० टक्के इतकी आहे. नोटबंदीपूर्वी रूपे कार्डच्या माध्यमातून होणारे व्यवहार एक हजार १०० कोटी रुपयांचे होते, त्यात आता मोठी वाढ झाली आहे. याचा अर्थ ती सेवा सामान्य माणसांपर्यंत पोहचल्याने त्यांनी तिचा पुरेपूर वापर केला आहे.

आंतरराष्ट्रीय कार्डांच्या तोडीस तोड कार्ड बाजारात उतरवून ते सरकारच्या मदतीने यशस्वी केल्याबद्दल नॅशनल पेमेंटस कार्पोरेशन ऑफ इंडियाला (एनपीसीए) धन्यवाद दिले पाहिजेत. त्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप आसबे असून ते रूपे कार्डच्या अधिक वापराविषयी नव्या नव्या योजना आणत आहेत. उदा. रूपे कार्डच्या माध्यमातून जीएसटीचा भरणा केल्यास त्यासाठी कॅशबॅक देण्याची योजना गेल्या ऑगस्टपासून सुरु करण्यात आली आहे. व्हिसा आणि मास्टरकार्डसारख्या कंपन्या कार्ड वापरल्याबद्दल अधिक सेवाशुल्क आकारतात, पण रूपे कार्डने हे शुल्क खूप कमी ठेवल्याने त्याचा वापर वाढला. नॅशनल पेमेंटस कार्पोरेशन ऑफ इंडिया (एनपीसीए) केवळ ६० पैसे शुल्क आकारते, जे व्हिसा आणि मास्टरकार्डपेक्षा खूपच कमी आहे. सर्वसामान्य माणसाने ते वापरण्यासाठी हे शुल्क कमी ठेवणे ही गरज होतीच.

रूपे कार्डसमोरजी दोन आव्हाने आहेत. त्यातील पहिले म्हणजे जे अधिक रकमेचे व्यवहार कार्डने करणारे श्रीमंत भारतीय आहेत त्यांच्यात अजून रूपे कार्डचा वापर कमी आहे. त्यामुळे रूपे कार्डचा वापर वाढला असला तरी त्याच्या एकूण व्यवहाराचे मूल्य कमी आहे. जनधन खाती असणाऱ्या ३० कोटी गरीबांना ती देण्यात आलेली असल्याने त्यांचा वापर साहजिकच ग्रामीण भागात अधिक आहे. दुसरे आव्हान आहे ते इतर देशात रूपे कार्डला अजून तेवढा स्वीकार नाही. यासाठी सरकार प्रयत्नशील आहे, पण त्याला वेळ लागेल असे दिसते. अर्थात, या आव्हानांमुळे रूपे कार्डचे महत्व अजिबात कमी होत नाही. ज्यांचा बँकिंग आणि डिजिटल व्यवहारांशी कधी सबंधच आला नव्हता त्यांच्यासाठीचा हा पुढाकार असल्याने तो उद्देश सफल होतो आहे हे महत्त्वाचे.

सुरुवातीला म्हटल्यानुसार भारताने अशा अनेक बाबतीत लोकसंख्येच्या बोनसचा पुरेपूर फायदा घेण्याची गरज आहे. ही लोकसंख्या चांगला ग्राहक होण्याची गरज आहे आणि ती प्रक्रिया निरंतर राहणार आहे. एका रूपे कार्डच्या प्रसारात लोकसंख्येचा हा बोनस घेतला गेला, तरी आंतरराष्ट्रीयकंपन्या खडबडून जाग्या झाल्या. असेच प्रयत्न इतर क्षेत्रातही केले गेले तर आपली खरी ताकद आपल्याला कळेल. व्हिसा आणि मास्टरकार्डच्या तक्रारीला सरकार भीक घालणार नाही, मात्र त्यासाठी भारतीय नागरिक म्हणून रूपे कार्डचा वापर असाच वाढत राहिला पाहिजे, कारण ती आपलीच जबाबदारी आहे.

---

# बाजाराचा कल ओळखा आणि कमाई करा!

**शेअर बाजारातील गुंतवणुकीत कल ओळखण्यास फार महत्त्व आहे. ज्यांना हा कल लक्षात येतो ते शेअर बाजारात कमाई करतात. आणि ज्यांना कमाई करावयाची त्यांनी या कलासोबत राहिले पाहिजे असे म्हणतात. आज आपण केवळ 'कल' याच गोष्टीबाबत पाहू यात...**


प्रसाद ल. भावे
sharpadvisers@gmail.com



आधी अमेरिकेच्या फेडने व्याजदर वाढविण्यासंदर्भात केलेली घोषणा, नंतर रशियाने युक्रेनवर हल्ला करण्याची निर्माण झालेली शक्यता, गुरुवारी युक्रेनवर झालेला हल्ला आणि त्यानंतर झालेल्या अनेक जागतिक घडामोडी यामुळे मागील दोन आठवड्यात बाजारानं चांगलाच रंग दाखवला आहे. अर्थात, अशा घटना काही नेहमी घडत नाहीत. मग इतर वेळी बाजारातील कल कसा ठरत असतो? परंतु हा रंग ओळखण्यासाठी आपल्यापैकी बहुतेक सर्व अगदी जिवाचं रान करताना आढळतात, परंतु फार कमी लोकांनाच यात यश मिळताना दिसतं आणि बहुधा असं यश हे चुकून लागलेल्या मटक्यासारखं असतं.., परंतु बाजाराचा अगदी अचूक रंग ओळखण्यात जरी आपण यशस्वी ठरलो नाही तरी काही अशा गोष्टी आहेत की ज्यामुळं आपल्याला बाजार खूप महाग झालाय किंवा स्वस्त झालाय हे कळू शकतं. जेव्हा पानवाल्यापासून लाँड्रीवाल्यापर्यंत कोणीही तुम्हाला एखाद्या कंपनीच्या शेअर खरेदीबद्दल (फुकटची) टीप देऊ लागतो तेंव्हा ओळखावं की बाजार स्वस्त (सहज) म्हणजेच बाजाराच्या भाषेत महाग म्हणजेच ओव्हर बॉट झालाय. आणि अगदी याउलट म्हणजे जेव्हा सर्वसामान्य गुंतवणूकदार बाजारातून आपली गुंतवणूक काढून घेऊन इतरत्र ठिकाणी गुंतवू पाहतोय असं आढळून आल्यास बाजारानं तळ गाठलाय असं समजावं. नक्कीच हे अनुभव आपण घेतच आलेलो असतो.


आता हे झाले भौतिक व्यवहारिक अनुभव, परंतु बाजाराचा खरा रंग ओळखण्यापेक्षाही मत्त्वाचा ठरणारा मुद्दा म्हणजे बाजाराचा बदललेला रंग ओळखणं आणि हे काहीशा सोप्या अभ्यासानं साध्य होऊ शकतं. त्यासाठी सर्वसाधारणपणे बाजाराचा कल म्हणजे ट्रेंड विचारात घेता येऊ शकतो. ट्रेंड इज युवर फ्रेंड असं मार्केटमध्ये उगाचच म्हटलं जात नाही. आता कल म्हणजे आला टेक्निकल म्हणजेच तांत्रिक भाग. आता अगदी बेसिक प्रश्न स्वतःलाच विचारूयात, की जर फक्त एखाद्या कंपनीचं मूलभूत विश्लेषण करून त्या कंपनीचे शेअर्स घ्यायचे ठरवले तर ते कोणत्या भावात घ्यायचे; म्हणजे योग्य भाव कोणता आणि दुसरं म्हणजे रोज जर कंपनीबाबतच्या मूलभूत गोष्टी म्हणजेच फंडामेंटल्स बदलत नसतील तर प्रत्येक सेकंदागणिक त्या कंपन्यांच्या शेअर्सच्या भावांत चढ-उतार का होताना दिसतात? याचं उत्तर एकच ते म्हणजे कोणत्याही गोष्टीची किंमत ही त्या गोष्टीसाठीचा मागणी वपुरवठा निश्चित करत असते आणि म्हणूनच इथं तांत्रिक विश्लेषणास महत्त्व प्राप्त होतं.

आता आधी काही नियम समजून घेऊ, नियम १) Market discounts everything (बाजारास सर्व गोष्टी अवगत असतात); नियम २) It reflect into the prices (कोणत्याही कंपनीच्या प्रत्येक भावातील हालचाल ही चार्टवर उमटली जातेच आणि त्या भावात त्या वेळची प्रत्येक गोष्ट समाविष्ट झालेली असते); नियम ३ : Price moves in trend (तक्त्यावर, भाव हे एका दिशेतच मार्गक्रमण करतात). पहिले दोन नियम हे कळावयास सोपे आहेत, परंतु तिसरा नियम समजायला अवघड आहे. आता प्रश्न आहे की भाव हे एका विशिष्ठ दिशेतच मार्गक्रमण का व कसे करतात? याचं उत्तर समजावून घेण्याचा प्रयत्न करू..

बाजारातील नियामकांच्या सर्वोत्तम प्रयत्नांनंतरही संवेदनशील माहिती ही हळुहळू बाजारामध्ये फुटतेच. सर्वप्रथम ती फक्त अगदी आतील गोटापर्यंत मर्यादित असते. मग त्या गोटातील खास लोकांच्या जवळील मंडळीपर्यंत, नंतर विश्लेषक आणि मोठ्या गुंतवणूकदारांपर्यंत आणि शेवटी सामान्य जनतेपर्यंत पोहचत असते. या प्रसारणात कांही मिनिटांपासून ते दिवसांपर्यंत वेळ लागतो. अनेक वेळा अशा बातम्या बाजारात येईपर्यंत त्यासंबंधीत कंपन्यांच्या शेअर्सच्या किंमतीत हालचाल होऊन गेलेली असते. उदा. एखाद्या कंपनीच्या बाबतीतील विशेष घटना अथवा आगामी काळात जाहीर होणारे निर्णय हे त्या कंपनीच्या मालकांव्यतिरिक्त संचालक मंडळास, प्रवक्त्यांस नक्कीच माहिती असतात. जर ती माहिती कंपनीसाठी सकारात्मक असेल तर अशा व्यक्तींकडून किंवा त्यांच्या जवळच्या नातेवाईकांकडून अशा कंपनीच्या शेअर्सची जोमानं खरेदी होते. नंतर जसजशी ही माहिती हळूहळू बाहेर येते तसतशी वर दिल्याप्रमाणे इतरांकडूनही खरेदी होऊ शकते. आता समजा अशा घडामोडींच्या आधी एखाद्या कंपनीचा भाव रु. १०० असेल तर सर्वप्रथम आतल्या गोटातील मंडळी म्हणजे कंपनीचे मालक, संचालक, प्रवर्तक, त्यांचे नातेवाईक, इ. लोक अचानक या कंपनीच्या शेअर्सच्या भावांवर तुटून पडतात व पुरवठ्यापेक्षा मागणी वाढल्यानं हे भाव १०१-१०२-१०३-११० पर्यंतदेखील वाढतात. तोपर्यंत, नंतरच्या गटातील लोकांना याची जाणीव होते व ते भाव खाली यायची वाट न पाहता ११०च्या भावात उड्या मारतात व भाव ११४-११५पर्यंत घेऊन जातात. आता पहिल्या गोटातील किरकोळ असलेल्यांना साधारणपणे १४-१५ %नफा मिळत असल्यानं त्यातील कांही नफावसुली करतात व भाव पुन्हा १०७-११०पर्यंत खाली येतात, परंतु ते तेजीच्या सुरुवातीच्या पायथ्याशी कधीच येत नाहीत याचं कारण म्हणजे ज्यांची सुरुवातीस खरेदी राहून गेलेली असते ते लोक या वाढून पडलेल्या भावात संधी साधतात व भाव पुन्हा ११५पर्यंत पोहोचतात. त्यामुळं कल-दिशेसाठी आता १००-१०७-११०-११५ असे उच्चांक स्थापन झालेले दिसतात आणि यालाच आलेखावर ट्रेंड म्हटलं जातं. उदाहरणच द्यायचं झालं तर रिलायन्स इंडस्ट्रीजचं देता येईल. २२ फेब्रुवारी २०१७ रोजी रिलायन्सनं जियोबद्दलची घोषणा केली आणि रिलायन्सच्या शेअरचा भाव त्याच दिवशीसुमारे ११ टक्क्यांनी वाढून मागील आठ वर्षांतील उच्चांकाजवळ पोहचला, परंतु बारकाईनं पाहिल्यास आता लक्षात येईल की याची मुहूर्तमेढ नोव्हेंबर २०१६पासूनच झालेली दिसते. रिलायन्सचा भाव रु. ४६५वरून हळूहळू रु.५४८ झाला पुन्हा ५०७ रुपयांपर्यंत खाली येऊन २१ फेब्रुवारी म्हणजे अधिकृत घोषणेच्या आदल्या दिवशी पुन्हा ५४५ रु. झाला व २२ फेब्रुवारीचा त्याचा बंद भाव होता ६०३ रुपये. अगदी याच्या उलट बाब कंपनीमध्ये एखादी खराब बातमी असल्यास किंवा कंपनीस हानीकारक बाबी असल्यास घडू शकते. उदा. डीएचएफएल. कंपनीबाबतची नकारात्मक बातमी फुटली २१ सप्टेंबर २०१८ला, परंतु या शेअर्सचा भाव ३ सप्टेंबर २०१८ पासूनच हळूहळू खाली खाली येऊ लागला होता. ३ सप्टेंबरचा उच्चांक होता, रु. ६९१.५, तर १९ सप्टेंबरच्या म्हणजे आदल्या दिवशीचा भाव होता ६१० रु. म्हणजे केवळ ११ सत्रांतच भाव तब्बल १२ टक्क्यांच्या आसपास पडला होता. तर अशा गोष्टी एका विशिष्ट पद्धतीनं चार्टवर नमूद होतात. गरज असते ती फक्त कल ओळखण्याची.

जेव्हा कोणताही भाव हा नवीन उच्चांक नोंदवत वरील बाजूनं मार्गक्रमण करत असतो व त्या नवीन उच्चांकांदरम्यान येणाऱ्या दुय्यम ट्रेंड (करेक्शन) मधील नीचांक देखील चढ्या भावातील असतात. अगदी याउलट प्रकार हा उतरत्या ट्रेंडमध्ये आढळतो. यामध्ये भाव हे नवीन नीचांक नोंदवताना दिसतात, तर दरम्यानचे दुय्यम ट्रेंड (पुलबॅक) हे देखील आधीच्या उच्चांकापेक्षा कमी भावाचे असतात. अपट्रेंड व डाऊनट्रेंडमध्ये साधारणपणे तीन अवस्था असतात, संचयन, सहभागिता व वितरण. संचयन म्हणजे जिथं शेअर्स मोठ्या प्रमाणातगोळा केले जातात. सहभागिता म्हणजे पहिल्या गुंतवणूकदारांमागून या प्रवाहात दाखल झालेले, तर वितरण म्हणजे नफेखोरी ज्यावेळेस पहिले गुंतवणूकदार हे मिळालेल्या बातमीचा जोर कमी होऊ लागल्यामुळंआपले शेअर्स विकण्यासाठी इतर नवीन गुंतवणूकदारांच्या/ट्रेडर्सच्या शोधात असताततती अवस्था. उतरत्या ट्रेंडमध्ये याच अवस्था काहीशा उलट क्रमानं असू शकतात. म्हणजे खराब बातमी कळाली असल्यास सर्वप्रथम स्वतःकडं असलेल्या शेअर्सचं वाटप (गळ्यात मारणं), त्यानंतर इतरांची सहभागिता, यात घेणारे, विकणारे व ट्रेडर्स दोन्ही असू शकतात.असो, जर आपणास बाजाराचा नेमका रोख समजू शकलोतर त्याच्या आधारे चांगल्या कंपन्यांमध्ये गुंतवणूक करण्यात जोखीम कमी राहू शकते. बाजारात एकूण तीन कल असू शकतात. एक प्रमुख अथवा मूळ कल जो प्रदीर्घ काळासाठी असू शकतो व जो सहसा बदलत नाही (प्रदीर्घ काळासाठीच्या गुंतवणुकीसाठी), एक मध्यम काळासाठी (साधारणपणे ३-५ वर्षं) व एक तात्पुरता म्हणजे शॉर्ट टर्म ट्रेंड, जो कांही महिने ते फारतर एखादवर्ष राहू शकतो. दोन उच्चांक अथवा दोन नीचांकांच्या आधारे आपण ट्रेंडलाईन (कलरेषा) आखू शकतो. अपट्रेंडमध्येअशा कलरेषा-आधारपातळीजवळ खरेदी करून आपल्या उद्दिष्टांनुसार नफेखोरी करून पुन्हा गुंतवणूक करावयाची झाल्यास भाव परत कलरेषेजवळ आल्यास गुंतवणूक करता येऊ शकते. जोपर्यंत कल बदलत नाही तोपर्यंतअसे ट्रेंड हे महत्त्वाचे ठरतात.

**बाजारात प्रमुख दोन प्रकारचेट्रेंड असतात, चढता कलवउतरता कल.**




---

## अर्थसाक्षर स्पर्धा : ९
### निकाल पुढीलप्रमाणे

**प्रश्न क्र. १. पुढीलपैकी कोणत्या कंपनीचा सेन्सेक्स ३० कंपन्यांत समावेश होत नाही?**
**उत्तर : *ड.)*** बजाज ऑटो

**प्रश्न क्र. २. देशभर सेवा देणाऱ्या किती विमान कंपन्या सध्या भारतात आहेत?**
**उत्तर : *क.)*** ७

**प्रश्न क्र. ३. भारतातील सिमेंट क्षेत्रातील सर्वांत मोठी कंपनी कोणती?**
**उत्तर : *अ.)*** अल्ट्राटेक सिमेंट

**अर्थसाक्षर स्पर्धा ९ची बरोबर उत्तरे देणारे विजेते स्पर्धक सुधीर शुंगारपूरे, प्रथमेश शेखर जगताप हे आहेत. स्पर्धकाला देण्यात येणारे गिफ्ट व्हाऊचर्स दुपारी २ ते ८ या वेळेत दैनिक राम प्रहरच्या कार्यालयातून घेऊन जावीत.**

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : १०

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सॲप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. पुढीलपैकी कोणती नवीकंपनी ३१ मार्चलाज्युनिअर निफ्टी५० मध्ये समाविष्ट होणार आहे?**
***अ.)*** नायका ***ब.)*** वेदान्त फॅशन ***क.)*** मेगास्टार फुड्स ***ड.)*** अदानी विल्मर

**२. एलआयसी ऑफ इंडियाच्यासध्या अंदाजे किती शाखा आहेत?**
***अ.)*** एक लाखापेक्षा अधिक ***ब.)*** ११ हजारांपेक्षा अधिक ***क.)*** ५० हजार ***ड.)*** २५ हजार

**३. तरुणपणी उत्पन्न सुरु होताच तुम्ही कोणत्या गुंतवणुकीला महत्व द्याल?**
***अ.)*** शेअर बाजार ***ब.)*** जीवन विमा योजना ***क.)*** एनपीएस ***ड.)*** कुटुंबाचाआरोग्य विमा




**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

# आमदार रविशेठ पाटील यांच्या हस्ते विविध विकासकामांचे भूमिपूजन

(छाया : अनिस मनियार)



**पेण : प्रतिनिधी**

तालुक्याचा सर्वांगीण विकास करणे हाच ध्यास असल्याने आमदार फंडातून ५० लाखाचा निधी देऊन वडखळ कोळवे गावाचा विकास करण्याचे ध्येय्य ठेवले आहे. कोळवे व परिसरातील गावांनी आपल्याला बहुमत दिले असून येथील नागरिकांचे प्रश्न सोडविणे हे माझे आद्य कर्तव्य समजतो, असे प्रतिपादन आमदार रविशेठ पाटील यांनी केले.

कोळवे गावातील विविध विकासकामांचे भूमिपूजन व उद्घाटन आमदार रविशेठ पाटील यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते. भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, तालुकाध्यक्ष श्रीकांत पाटील, पं.स. सदस्य प्रदीप म्हात्रे, प्रतीक मढवी, माजी उपसरपंच रवींद्र म्हात्रे आदीसह ग्रामस्थ या वेळी उपस्थित होते.

आमदार पाटील पुढे की, वडखळ कोळवे गावावर माझे नितांत प्रेम आहे. मी पहिल्यांदा आमदार झालो तेव्हा या गावचा विकास केला होता, त्यानंतर दहा पंधरा वर्षे या गावाकडे विरोधी पक्षांनी ढुंकूनही पाहिले नाही. परंतु तुम्ही मला आमदार केल्यामुळे गावाचा विकास करणे माझे आद्य कर्तव्य समजतो. कोळवे ते वडखळ या रस्त्याच्या कामाचा शुभारंभ १५ वर्षांपूर्वी माझ्या हस्ते करण्यात आला होता. त्यानंतर पंधरा वर्ष या रस्त्याकडे विरोधी पक्षांनी पाहिले नाही. त्यामुळे या रस्त्यामध्ये खड्डे की खड्ड्यात रस्ते अशी अवस्था या रस्त्याचे झाली आहे. ग्रामस्थांनी पाठपुरावा केल्यामुळे मी कोळवे ते वडखळ रस्त्यासाठी ५० लाखाचा निधी दिला आहे. हा रस्ता दहा दिवसात पूर्ण होणार असल्याचेही आमदार रविशेठ पाटील यांनी या वेळी सांगितले.

वडखळ विभागात दोन विसर्जन घाट, दोन व्यायाम शाळा उभारण्यासाठी आमदार फंडातून निधी देण्यात आला असल्याची माहिती आमदार पाटील यांनी दिली. यावेळी कोळवे ग्रामस्थांनी आमदार रविशेठ पाटील यांचा सत्कार केला.

जल जीवन मिशन अंतर्गत घरात नळ पाणी पुरवठा योजना पूर्ण करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. या वर्षात प्रत्येक घरात मानसी ६५ लिटर पाणी तसेच जेएसडब्ल्यू सीएसआर फंडतून गावासाठी निधी मिळवून देणार असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले.

# कर्जतमध्ये मेल, एक्सप्रेस गाड्यांचे थांबे पुन्हा सुरू करावेत

## पॅसेंजर असोसिएशनचे रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांना साकडे



(छाया : विजय मांडे)

**थांबे रद्द झालेल्या रेल्वेगाड्या**

**चेन्नई मेल, कोणार्क एक्सप्रेस, कन्याकुमारी एक्सप्रेस, गडक एक्सप्रेस, सिकंदराबाद एक्सप्रेस, सिद्धेश्वर एक्सप्रेस, लातूर एक्सप्रेस, महालक्ष्मी एक्सप्रेस, हैदराबाद एक्सप्रेस, डेक्कन एक्सप्रेस, कोयना एक्सप्रेस, कोल्हापूर-अहमदाबाद एक्सप्रेस.**

**कर्जत : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेच्या कर्जत स्थानकात मेल, एक्सप्रेस गाड्यांचे थांबे पुन्हा सुरू करावेत, अशी मागणी येथील रेल्वे पॅसेंजर असोसिएशनचे माजी सचिव नितीन परमार यांनी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

पुण्याहून मुंबईला जाणाऱ्या सर्व मेल, एक्सप्रेस रेल्वे गाड्या पुर्वी कर्जत स्थानकात थांबत असत, मात्र कोरोनाची लाट आल्यापासून कर्जत स्थानकातील सर्व मेल, एक्सप्रेस गाड्यांचे थांबे रद्द करण्यात आले होते. आता कोरोनाची लाट ओसरल्यानंतरही कर्जत स्थानकातील एक्सप्रेस गाड्यांचे थांबे पूर्ववत सुरु झालेले नाहीत. त्यामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे, असे निवेदनात म्हटले आहे.

मुंबई, तसेच गुजरात, राजस्थान, मध्यप्रदेश आदी रेल्वे मार्गावरून जाणाऱ्या मेल, एक्सप्रेस गाड्या पुर्वी कर्जत स्थानकात थांबत असत. त्यामुळे पुण्यावरून या गाड्यांमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना कर्जत स्थानकात उतरून पुढे लोकल पकडून माथेरान, नेरळ, पनवेल, खोपोली, अंबरनाथ आदी त्यांना हवे असलेल्या ठिकाणी जाता येत होते. मात्र आता या गाड्या कर्जतला न थांबता पुढे जाऊन थेट कल्याण स्थानकात थांबत असल्याने प्रवाशांना कल्याणवरून लोकल पकडून पुन्हा मागचा तथा उलटा प्रवास करावा लागत आहे. त्यामध्ये प्रवाशांचा विनाकारण अधिकचा वेळ व पैसा जात असून मनःस्ताप सहन करावा लागत आहे. यामुळे रेल्वे प्रवाशातून संतप्त भावना व्यक्त होत आहेत.

प्रवाशांना होणाऱ्या गैरसोयीची दखल घेऊन सर्व मेल, एक्सप्रेक्स गाड्यांचे कर्जत रेल्वे स्थानकातील थांबे पूर्वीसारखेच त्वरित सुरू करावेत, या मागणीचे निवेदन कर्जत रेल्वे पॅसेंजर असोसिएशनचे माजी सचिव नितीन परमार यांनी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांची भेट घेऊन त्यांच्याकडे दिले.

# महाडमधील तीन विद्यार्थी युक्रेनमध्ये; मुग्धा मोरे बंकरमध्ये सुरक्षित

**महाड : प्रतिनिधी**


युक्रेनमध्ये वैद्यकीय शिक्षण घेत असलेली महाड शहरातील मुग्धा पद्माकर मोरे, बिरवाडीमधील खुर्रम एजाज बिरादार आणि शोएब पठाण हे तीन विद्यार्थी तेथे अडकले आहेत. मुग्धा मोरेने कीव येथील वैद्यकीय महाविद्यालयातील बंकरमध्ये आश्रय घेतला आहे. तर खुर्रम आणि शोएब या दोघांना पोलंडमध्ये पाठविण्यात येत असून तेथून ते भारतात परत येणार आहे.

मुग्धा ही शिवसेनेचे उपजिल्हा प्रमुख पद्माकर मोरे यांची कन्या आहे. खुर्रम हा बिरवाडी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. एजाज बिरादार यांचा मुलगा तर शोएब हा डॉ. बिरादार यांचा मावसभाऊ आहे. गुरुवारी पहाटे युद्धाचा भोंगा झाल्यानंतर मुग्धाने प्रथम भूमिगत मेट्रो स्टेशनमध्ये आसरा घेतला. अकरा तासांनंतर तिला कीव येथील वैद्यकीय महाविद्यालयात तयार करण्यात आलेल्या बंकरमध्ये पाठविण्यात आले. खुर्रम आणि शोएब यांना लविव शहरातून बसद्वारे पोलंड येथे पाठविण्यात येणार असून तेथून ते भारतात परतणार आहेत. हे तिन्ही विद्यार्थी सुरक्षित असून आमच्या संपर्कात असल्याची माहिती पद्माकर मोरे आणि डॉ. एजाज बिरादार यांनी दिली.

# जुम्मापट्टी शाळा परिसरात लावले माकड पकडण्यासाठी पिंजरे

**कर्जत : बातमीदार**

नेरळ जुम्मापट्टी येथील प्राथमिक शाळेतील वर्गात घुसून पिसाळलेल्या माकडाने गुरुवारी (दि. २४) पहिल्या इयत्तेतील विद्यार्थिनीला चावा घेतला होता. त्या जखमी विद्यार्थिनीला उल्हासनगर येथे उपचार करून घरी आणण्यात आले आहे. दरम्यान, त्या ठिकाणी येणाऱ्या माकडांना पकडण्यासाठी वन विभागाने या शाळेच्या परिसरात पिंजरे लावले आहेत.



(छाया : संतोष पेरणे)

कर्जत तालुक्यातील नेरळ ग्रामपंचायत हद्दीमधील जुम्मापट्टी या आदिवासी लोकवस्तीच्या गावातील प्राथमिक शाळेच्या वर्गात घुसून पिसाळलेल्या माकडाने गुरुवारी प्रज्ञा शिंगाडे या सहा वर्षाच्या मुलीला चावा घेतला होता. तिला उपचारासाठी नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्रात नेले. मात्र तेथे आवशयक असलेले इंजेक्शन उपलब्ध नव्हते. त्यामुळे प्रज्ञाला शाळेच्या मुख्याध्यापिका गीता पाटील, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष नरेंद्र पारधी व पालकांनी उल्हासनगर येथील सेंट्रल हॉस्पिटलमध्ये दाखल केले. उपचारानंतर प्रज्ञाला घरी सोडण्यात आले.

दरम्यान, स्थानिकांच्या मागणीनंतर वन विभागाने पिसाळलेल्या माकडांना पकडण्यासाठी जुम्मापट्टी शाळेच्या परिसरात पिंजरा बसविला. या वेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नरेंद्र पारधी, शाळेच्या मुख्याध्यापिका गीता पाटील, ग्रामस्थ सुनील पारधी, तुळशीराम निरगुडे, तसेच शिक्षिका सुनीता खैरे, माधुरी केवारी, छाया चव्हाण, वैशाली ढोले आदींसह पालक उपस्थित होते.

**पिसाळलेल्या माकडांना पकडण्यासाठी जुम्मापट्टी प्राथमिक शाळेच्या परिसरात पिंजरा लावण्यात आला असून, मुंबई येथून माकडे पकडणाऱ्यांच्या पथकालाही पाचारण केले आहे. हे पथक आल्यानंतर पिसाळलेल्या माकडांना पकडण्याची मोहीम सुरू करण्यात येईल.**

**-एस. एच. म्हात्रे, वनपाल, नेरळ**

# पोलीस मिनीबस घुसली चहाच्या टपरीत

## खांब-कोलाड मार्गावर अपघात; चौघे जखमी, टपरीधारकाचे मोठे नुकसान

(छाया : जितेंद्र जाधव)



**धाटाव : प्रतिनिधी**

खांब-कोलाड मार्गावरील पुगाव गावाच्या स्टॉपवर असलेल्या चहाच्या टपरीत शुक्रवारी (दि. २५) सकाळी पोलीस मिनीबस घुसली. या घटनेत चार पोलीस कर्मचारी किरकोळ जखमी झाले असून मिनीबससह टपरीचे अतोनात नुकसान झाले.

पोलीस मिनीबस (एमएच-०६,के-९९३०) शुक्रवारी सकाळी १०.३० वाजण्याच्या सुमारास खांबकडून कोलाडकडे जात होती. चालक संजय अण्णा चव्हाण यांचे नियंत्रण सुटल्याने मिनिबस पुगाव गावाच्या स्टॉपवर असलेल्या रुपेश अधिकारी यांच्या सद्गुरु चहाच्या टपरीत घुसली. या अपघातात चालक संजय चव्हाण यांच्यासह मिनीबसमधील चार पोलीस शिपाई किरकोळ जखमी झाले. त्यांच्यावर कोलाड आंबेवाडी प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार करण्यात आले. तर पाच पोलीस कर्मचाऱ्यांना मुकामार आहे. या घटनेची नोंद कोलाड पोलीस ठाण्यात करण्यात आली असून अधिक तपास निरीक्षक सुभाष जाधव करीत आहेत.

# मराठी भाषा दिन



कवी कुसुमाग्रज तथा विष्णू वामन शिरवाडकर यांचा २७ फेब्रुवारी हा जन्म दिवस. १९८७ साली त्यांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला तेव्हापासून त्यांचा जन्मदिवस मराठी भाषा दिन म्हणून प्रती वर्षी साजरा केला जातो.

भाषा ही समाजाचे महत्वाचे अंग आहे. एकमेकांशी संवाद साधण्याचे प्रमुख साधन आहे. संपूर्ण भारतातच नव्हे तर इस्त्रायल, मॉरिशस येथेही मराठी मायबोली बोलली जाते, हे संशोधना अंती दिसून आले आहे. संत ज्ञानेदव माऊलींनी १२९० साली ज्ञानेश्वरी हा अमुल्य ग्रंथ लिहिला, तोही मराठीत. त्यांनी अमृतासाठी पैजा जिंके जिंके असे सांगून मराठी भाषेचे कौतुक केले आहे. त्यावरून मराठी एक समृध्द भाषा आहे, हे सिध्द होते. महाराष्ट्रातील साधू-संतांनी त्यांची ग्रंथसंपदा कवने, भारूडे व अभंग मराठी भाषेतून लिहिली आहेत. त्यांनी मराठी साहित्यात अत्यंत मोलाचे योगदान दिलेले आहे. बाराव्या तेराव्या शतकात अनेक लेखक, कवींना तत्कालीन राज्यकर्त्यांनी राजश्रय दिला होता. त्यांनी मराठी साहित्यात मोलाची भर घातली आहे. स्वतंत्र भारतात १९६० साली महाराष्ट्र हा मराठी भाषिकांचे एक राज्य स्थापन झाले. म्हणूनच आम्ही गर्वाने बोलतो...

लाभले आम्हांस भाग्य, बोलतो मराठी,
जाहलो खरच धन्या, ऐकतो मराठी,
धर्म, पंथ, जात एक, जाणितो मराठी,
आमच्या उराउरात स्पंदने मराठी

मराठी भाषेत अनेक बोली भाषेतून संवाद साधला जातो. असे म्हणतात की, प्रत्येक १२ मैलावर बोली भाषेत बदल दिसतो. कोकणात पनवेल, उरण, कर्जत, अलिबाग तालुक्यांत आगरी भाषेचे प्राबल्य आहे.तर महाड, पोलादपूर, चिपळूण येथील मराठी लोक कुणबी भाषा बोलतात. भाषा एकच पण बोलण्याची ढब किंवा शैली वेगळी असते. शिवाय ठाकूर, कातकरी या वन्य जमातींची भाषा वेगळी आहे. रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात मालवणी भाषा बोलली जाते. त्यामध्ये संवाद साधण्यात फरक दिसून येतो. पण भाषा कोकणीच. आगरी कोळी भाषेत साम्य दिसले तरी बोलताना फरक जाणवतो. ठाणे जिल्ह्यात विशेषत: खेडेगावातून तावडी, वऱ्हाड प्रातांत वऱ्हाडी, घाट माथ्यावर घाटी, तर धुळे, जळगाव भागात अहिरणी भाषा बोलतात. अशा एकूण ४० बोली भाषा महाराष्ट्रात आहेत.

दरवर्षी साहित्य संमेलने होतात. अध्यक्षांपासून सगळे सारस्वत भाषेवर अधिकार वाणीने बोलतात. मात्र मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याबद्दल व बोली भाषा अस्तित्वात राहण्यासाठी प्रयत्न होताना दिसत नाहीत. ते झाले तरच मराठी भाषा दिन साजरा केल्याचे सार्थक होईल. सांप्रत महाराष्ट्रात अनेक प्रांतातील लोक नोकरी धंद्यानिमित्त महाराष्ट्रात येत आहेत. त्यांच्या वेगळ्या बोली भाषा असतील परंतु उत्तर प्रदेश, बिहार, दिल्ली प्रामुख्याने हिंदी भाषा बोलतात. मद्रासची तामीळ भाषा, बंगालची बंगाली, केरळची मल्याळम्, आसामी या भाषाही आता महाराष्ट्रात बोलल्या जात असल्या तरी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला पाहिजे अशी आशा व्यक्त करतो.

**-अनंत कानु सिंगासने, पनवेल**

# रोह्यात विनापरवाना वृक्षतोड

## माजी नगरसेवकाच्या मुलाविरोधात वनविभागाकडे गुन्ह्याची नोंद


**धाटाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील वरसे ग्रामपंचायत हद्दीमधील वनपरिक्षेत्रात अवैध वृक्षतोड केल्या प्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेसचे रोहा येथील माजी नगरसेवक राजेंद्र जैन यांचा मुलगा सनी राजेंद्र जैन यांच्यावर वनविभागात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

रोहा वनपरिक्षेत्रातील स. नं. २७३ हि. नं ३ व ४ मध्ये मोठ्या प्रमाणावर अवैध वृक्षतोड झाली असल्याबाबतची तक्रार वन विभागाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्यांना दूरध्वनी मार्फत प्राप्त झाली होती. त्या अनुषंगाने वनपाल चव्हाण व त्यांच्या पथकाने घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता जेसीबीच्या सहाय्याने तब्बल ५० झाडे छाटल्याचे आढळून आले. या अवैद्य वृक्षतोड प्रकरणी सनी राजेंद्र जैन यांच्याविरुद्ध गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास वनविभागाचे वरिष्ठ अधिकारी प्रशांत पाटील हे करीत आहेत.

**या वनक्षेत्रात चिंच, आंबा, करंज, टाकळा, बोर, सीताफळ इत्यादी अनेक छोटी-मोठी ५० ते ६० झाडे होती. ही झाडे विनापरवाना तोडण्यात आली आहेत. त्याचा अहवाल वरिष्ठांना पाठविण्यात आला असून, सनी जैन यांना काही दिवसात चौकशीसाठी बोलवण्यात येईल. या प्रकरणी योग्य ती कारवाई करण्यात येईल.**

**-आण्णा इनामदार, लेखापाल,वनविभाग रोहा.**



# पेण पांडापूर येथे शाळापूर्व तयारी मेळावा

**पेण : प्रतिनिधी**

तालुक्यातील पांडापूर येथील प्राथमिक शाळेत प्रथम फाउंडेशनच्या वतीने शाळापूर्व तयारी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात एकुण २३ विद्यार्थ्यांच्या माता पालकांनी आपल्या पाल्यासहीत उपस्थित दर्शविली.



शाळेचे मुख्यापक नरेश तांबोळी यांनी प्रास्ताविकात फाउंडेशनविषयी माहिती दिली. पहिली व दूसरीच्या विद्यार्थ्यांमध्ये शारिरीक, बौद्धिक, भावनिक, सामाजिक क्षमतांचा विकास करणे हा मेळाव्याचा हेतू असल्याचे फाउंडेशनच्या वतीने सांगण्यात आले. सहशिक्षिका कांचन तांडेल यांनी या उपक्रमात सहभाग घेतला होता. सहभागी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते रिपोर्टकार्डचे वाटप करण्यात आले.

फाउंडेशनचे समन्वयक हिरामण शिंगवा यांनी तालुका प्रमुख शलाका पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली या मेळाव्याचे आयोजन केले होते. या मेळाव्याच्या माध्यमातून मुलांसोबत मातांनाही आपल्या मुलाची आकलन व बौद्धिक क्षमता ओळखणे सोपे झाल्याचे मत पालकांनी व्यक्त केले.

# माणगाव तालुका पत्रकार संघाचा पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या मान्यवरांचा माणगाव तालुका पत्रकार संघाच्या वतीने शुक्रवारी (दि. २५) पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

माणगावमधील कुणबी भवन येथे शुक्रवारी झालेल्या या सोहळ्यात तहसीलदार प्रियांका आयरे कांबळे (आदर्श प्रशासकीय अधिकारी), शांताराम खाडे (अध्यात्मिक), चंद्रशेखर देशमुख (सहकार), महादेवराव बक्कम (समाजभूषण), ॲड. केदार (विधी), डॉ. प्रदीप इंगोले (वैद्यकीय सेवा), तळाचे उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे (आदर्श लोकप्रतिनिधी), राजनभाई मेथा (यशस्वी उद्योजक), नेहा दाखिनकर (आदर्श महिला सरपंच), मंगेश पोळेकर (तरुण उद्योजक), संजय गांधी (कोविड योद्धा), राजेंद्र तेटगुरे (आदर्श ग्रामसेवक), शंकर शिंदे (आदर्श शिक्षक), डॉ. आरिफ पागारकर (ज्येष्ठ पत्रकार), देवयानी मोरे (महिला युवा पत्रकार), किशोर मालुसरे (आदर्श तलाठी), लालासो वाघमोडे (कर्तव्यदक्ष वाहतूक पोलीस), रामदास जाधव (प्रगतशील शेतकरी) आदींना पालकमंत्री आदिती तटकरे आणि आमदार भरत गोगावले यांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

या सोहळ्याचे सूत्रसंचालन प्रा. नीलिमा काप व प्रा. शब्बीर हजू यांनी केले. नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, पं.स. सभापती अलका जाधव, भाजपचे तालुका अध्यक्ष संजयआप्पा ढवळे, नगरसेवक आनंद यादव, नगरसेविका ममता थोरे, तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष सलीम शेख आदींसह नागरिक, पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष प्रभाकर मसुरे यांनी आभार मानले. प्रा. हर्षल जोशी, प्रा. सतीश बडगुजर व त्यांच्या सहकाऱ्यांनी तसेच पत्रकार संघाच्या सर्व सदस्यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

**CHANGE OF NAME**

I the undersigned **RUKMINI SAHEBRAO MANE** (Old name) residing At **Deep City CHS., Phase-I, Building No-2, A-wing, Room No-003, Usarli Khurd, Survey No-150, New Panvel, Raigad-410206.**

I Changed my Name by the **Affidavit No. 132328** dated **25 February 2022.** So that I remitter issue may here after be called by new Name **RUKIMANI SAMADHAN YADAV.**

Sign. by New Name

**RUKIMANI SAMADHAN YADAV**

**हरवले आहे**

मी श्री. दिनेश चत्रभुज शाह, वय ६० वर्ष, राहणार ए/४०१, आदित्य प्रज्ञा को आ.हॉ.सो.,गोखले हॉलजवळ, पनवेल, ता. पनवेल,जि. रायगड-४१०२०६.की वरील ठिकाणी रहात असून माझे नावे असलेले फ्लॅट नं. डी/०२, जुने पोस्ट ऑफिस समोर, पनवेल, ता. पनवेल,जि. रायगड-४१०२०६. सदरच्या सदनिका मिळकतीचे सोसायटीचे शेअर्स सर्टिफिकेट क्र. ०३१ शेअर्स भाग नं.१५१ ते १५५ या प्रमाणे सदरचे शेअर्स सर्टिफिकेट माझेकड़न पनवेल परिसरात प्रवास करतेवेळी कुठेतरी गहाळ / हरवले असून सदर सोयासटीचे शेअर्स सर्टिफिकेटची दुय्यम प्रत मिळणेकरीता सोसायटी कडे अर्ज केलेला आहे. सदर सदनिका श्री. धवल अशोक शाह यांचे नावे मी बक्षिसपत्राने दिली आहे. सदरचे शेअर्स सर्टिफिकेटची दुय्यम प्रत श्री. धवल अशोक शाह यांचे नावाने देण्यात यावे.तरी ह्या जागे संदर्भात कोणास हि हरकत असल्यास सोसाटीकडे अथवा वरील पत्या वर १० दिवसात संपर्क करावा . त्या नंतर कोणतीही हरकत विचारात न घेता सोसायटी दुय्यम प्रत माझ्या अर्जा प्रमाणे देईल ॲफिडेव्हिट नंबर 3219/2022 - 215204173126860033758, तारीख :22/02/2022

# दिल्लीची 'दबंग'गिरी

## पाटणाला नमवून बनले प्रो कबड्डीचे नवे विजेते

**बंगळुरु : वृत्तसंस्था**

दबंग दिल्लीने प्रो कबड्डी लीगच्या आठव्या हंगामाचे विजेतेपद पटकाविले आहे. विक्रमवीर चढाईपटू प्रदीप नरवालच्या अनुपस्थितीत चौथ्यांदा जेतेपदाचे स्वप्न पाहणाऱ्या पाटणा पायरेट्सला रोमहर्षक लढतीत दिल्लीने ३७-३६ असे नमवले आणि नवीन विजेते म्हणून उदयास आले.

बंगळुरूच्या शेरेटॉन हॉटेलच्या क्रीडांगणावर झालेल्या अंतिम सामन्यात बचावपटूंपेक्षा आक्रमकांचे वर्चस्व पाहायला मिळाले. दिल्लीच्या विजयाचे विजय मलिक (१४ गुण) आणि नवीन कुमार (१० गुण) हे शिल्पकार ठरले. दिल्लीकडून अनुभवी बचावपटू मनजीत चिल्लर आणि संदीप कुमार यांनी प्रत्येकी दोन गुण मिळवले.

सामन्याच्या सुरुवातीला नवीन आणि सचिन तन्वर यांच्यातील चढायांतील बोनस गुणासाठीची जुगलबंदी पाहायला मिळाली. सचिन (१० गुण) आणि



गुमान सिंग (नऊ गुण) यांनी पाटण्याला पहिल्या सत्रात १७-१५ अशी आघाडी मिळवून दिली, पण पहिला लोण १५व्या मिनिटाला दिल्लीने पाटण्यावर चढवला. दुसऱ्या सत्रात ११व्या मिनिटाला दिल्लीने पाटण्याला २५-२५ असे बरोबरीत गाठले. मग १४व्या मिनिटाला दिल्लीने दुसरा लोण चढवला आणि आघाडी घेतली. १७व्या मिनिटाला विजयने चढाईत एक बोनससह तीन गुण वसूल करीत दिल्लीला मोठी आघाडी मिळवून दिली, मात्र अखेरच्या मिनिटांत पाटण्याच्या मोनू आणि मोहम्मदरझा शाडलू यांनी चढायांच्या गुणांवर कडवी लढत दिली. विजयने यशस्वी चढायांचे सातत्य राखत संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.

पाटण्याचा बचावटू मोहम्मदरझाची जादू अंतिम सामन्यात पाहायला मिळाली नाही. उपांत्य सामन्यात प्रदीप नरवालच्या यूपी योद्धाला हरवण्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या मोहम्मदरझाला फक्त दोन गुण मिळवता आले. दुसरीकडे नवीन आणि विजय यांनी अपेक्षेप्रमाणे चढायांतील वैयक्तिक खेळ उंचावला. याचबरोबर मनजीत, जिवा आणि संदीप या अनुभवी खेळाडूंचा बचाव संघासाठी महत्त्वाचा ठरला. त्यामुळे गतवर्षी हुकलेले जेतेपद यंदा दिल्लीला जिंकता आले.

- **स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू**
  **नवीन कुमार (दबंग दिल्ली)**
- **सर्वोत्तम चढाईपटू**
  **पवन शेरावत (बंगळूरु बुल्स)**
- **सर्वोत्तम पकडपटू**
  **मोहम्मदरझा (पाटणा पायरेट्स)**
- **सर्वोत्तम नवोदित खेळाडू**
  **मोहित गोयल (पुणेरी पलटण)**



# मार्च महिन्यात रंगणार रायगड क्रिकेट चॅम्पियन्स लीग

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड क्रिकेट स्पोर्ट्स अ‍ॅण्ड वेल्फेअर असोसिएशनच्या वतीने रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या मान्यतेने मार्च महिन्यात रायगड क्रिकेट चॅम्पियन लीग ट्वेन्टी-२० स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे. या स्पर्धेची अधिकृत घोषणा शुक्रवारी (दि. २५) करण्यात आली.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते रायगड क्रिकेट स्पोर्ट्स अ‍ॅण्ड वेल्फेअर असोसिएशन या संघटनेचे उद्घाटन झाले. पनवेल तालुक्यातील मानघर येथील छाया रिसॉर्ट येथे झालेल्या या उद्घाटन समारंभात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते संघटनेचे बोधचिन्ह, वेबसाईट तसेच माहितीपत्रिकेचे अनावरण करण्यात आले. रायगड क्रिकेट चॅम्पियन लीग ट्वेन्टी-२० स्पर्धेची अधिकृत घोषण याच कार्यक्रमात करण्यात आली.

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे सेक्रेटरी रियाज बागवान, खजिनदार सुभेंद्र भांडारकर, रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत मते, कार्याध्यक्ष प्रदीप नाईक, भारतीय क्रिकेट संघाचा कर्णधार रोहित शर्माचे प्रशिक्षक दिनेश लाड, माजी रणजीपटू संग्राम सावंत, विनीत इंदूलकर, राष्ट्रीय कबड्डीपटू निलेश शिंदे, भाजप नेते सुधीर घरत, रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे उपाध्यक्ष अनिरुद्ध पाटील, प्रकाश पावसकर, सेक्रेटरी विवेक बहुतूले, खजिनदार राजेंद्र भावे, उपसेक्रेटरी प्रशांत ओक, संतोष मढवी, अरुण भोईर, अण्णा गावडे, नवीन घाटवळ आदी मान्यवर समारंभास उपस्थित होते.

या वेळी रायगड जिल्ह्यातील वरिष्ठ क्रिकेटपटू विजय पाटील, राजेंद्र कोंडाळकर, प्रकाश शिंगरूत, रवी तांडेल, भूषण मोरे यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. रायगड क्रिकेट स्पोर्ट्स अ‍ॅण्ड वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष किरीट पाटील यांनी प्रास्ताविक केले. उपाध्यक्ष प्रीतम कैया, संदीप पाटील, सेक्रेटरी सुयोग चौधरी, सहसेक्रेटरी विजय तांडेल, खजिनदार सुहास हिरवे, सदस्य प्रशांत माने, सचिन मते, प्रज्ञेश पावसकर स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत.

*रायगड क्रिकेट चॅम्पियन्स लीगमुळे रायगड जिल्ह्यातील खेळाडूंना आपल्यातील गुणवत्ता दाखवून देण्याची संधी मिळणार आहे. स्पर्धेचा दर्जा उच्च असेल. त्यामुळे तरुण खेळाडूंसाठी ही स्पर्धा उपयुक्त ठरेल. या स्पर्धेसाठी सर्वतोपरी मदत करू.*

**-प्रशांत ठाकूर,** *आमदार, पनवेल*

*ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी आवश्यक असलेले सहकार्य रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन करेल.*

**-प्रदीप नाईक,** *कार्याध्यक्ष, रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन*

*रायगड जिल्ह्यात अनेक गुणवान, उदयोन्मुख खेळाडू आहेत. त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी महिन्यातील काही दिवस येण्याची आपली तयारी आहे. या जिल्ह्यातून एक तरी क्रिकेटपटू भारतीय संघात खेळेल.*

**-दिनेश लाड,** *क्रिकेट प्रशिक्षक*

# राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेची गटवारी जाहीर

**ठाणे : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशच्या विद्यमाने ठाणे जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या यजमान पदाखाली हिंदवी युवा प्रतिष्ठान व वेताळ क्रीडा मंडळ यांच्या संयुक्त सहकार्याने राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा २८ फेब्रुवारी ते ३ मार्च या कालावधीत होणार आहे. ठाणे-भिवंडी येथील बंदऱ्या मारुती क्रीडानगरीत हे सामने खेळविण्यात येणार आहेत. स्पर्धेची गटवारी जाहीर करण्यात आली आहे.

कोविडमुळे गतवर्षी पुरुषांची निवड चाचणी न होता मैदानी चाचणी घेऊन संघ निवड करण्यात आली होती व तो संघ अयोध्येच्या राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी झाला होता. त्यामुळे चिपळूण येथील स्पर्धेत सहभागी झालेल्या स्पर्धेतील कामगिरीनुसार संघांना मानांकन देण्यात आले असून महिलांची गटवारी मात्र नुकतीच परभणी येथे झालेल्या स्पर्धेतील कामगिरी नुसार करण्यात आली आहे.

स्पर्धेतील विजेत्या पुरुष संघाला श्रीकृष्ण फिरता चषक व जिल्हाध्यक्ष कायमस्वरूपी चषक प्रदान करण्यात येईल, तर महिला विजेत्या संघाला फिरता पार्वतीबाई सांडव चषकाबरोबर जिल्हाध्यक्ष कायम स्वरूपी चषक देऊन सन्मानित करण्यात येईल. या स्पर्धेकरिता या स्पर्धेकरिता मातीची सहा क्रीडांगणे तयार करण्यात आली आहेत. क्रीडांगणे व प्रेक्षक गॅलरी तयार करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असून ते अंतिम टप्प्यात आले आहे.

### पुरुष गट विभागणी

अ गट-रत्नागिरी, बीड, पालघर, नांदेड; ब गट-मुंबई शहर, अहमदनगर, औरंगाबाद, सोलापूर; क गट- रायगड, नंदुरबार, नाशिक, जालना; ड गट-सांगली, धुळे, लातूर, सातारा; इ गट-मुंबई उपनगर, ठाणे, जळगाव, परभणी; फ गट-पुणे, कोल्हापूर, सिंधुदुर्ग, उस्मानाबाद, हिंगोली.

### महिला गट विभागणी

अ गट-पुणे, सोलापूर, सांगली; ब गट-मुंबई शहर, रायगड, नाशिक; क गट-मुंबई उपनगर, ठाणे, सिंधुदुर्ग; ड गट-पालघर, धुळे, अहमदनगर; इ गट-औरंगाबाद, परभणी, बीड, नांदेड; फ गट-रत्नागिरी, कोल्हापूर, सातारा, जळगाव.

# आयपीएलमधील संघांची विभागणी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

इंडियन प्रीमियर लीगच्या नव्या पर्वाचे नवे स्वरूप जाहीर करण्यात आले असून यंदा १० संघांना प्रत्येकी १४ साखळी सामनेच खेळावे लागणार आहेत, मात्र या संघांना दोन गटांत विभागण्यात आले असून मुंबई इंडियन्स आणि चेन्नई सुपर किंग्ज हे बलाढ्य संघ वेगवेगळ्या गटात असतील.

गटवारीनुसार अ-गटात पाच वेळा विजेता मुंबई इंडियन्स, कोलकाता नाइट रायडर्स, राजस्थान रॉयल्स, दिल्ली कॅपिटल्स आणि लखनऊ सुपर जायंट्स या संघांचा समावेश आहे. ब-गटात गतविजेता चेन्नई सुपर किंग्ज, सनरायजर्स हैदराबाद, रॉयल चॅलेंजर्स बंगळूरु, पंजाब किंग्ज आणि गुजरात टायटन्स हे संघ आहेत. २६ मार्चपासून आयपीएलचा थरार रंगेल.

यंदा १० संघांची दोन गटांत विभागणी करण्यात आली आहे. प्रत्येक संघाचे आपल्या गटातील सर्व संघांशी प्रत्येकी दोन सामने होतील तसेच दुसऱ्या गटातील आपल्या ओळीत असलेल्या संघाशी दोन, तर अन्य चार संघांशी प्रत्येकी एक सामना होईल.

# देवद, वांगणी तर्फे वाजेत विकासकामांचे भूमिपूजन













पनवेल : आई गावदेवी क्रिकेट संघाच्या वतीने केवाळे-ठाकूरवाडी येथे क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेला भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट दिली. त्यांचे स्वागत करण्यात आले. या वेळी तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, जि. प. सदस्य अमित जाधव, पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, भाजप सुकापूर विभागीय अध्यक्ष राजेश पाटील, वाहतूक सेल तालुका सहसंयोजक रोशन पाटील, बाबू गायकर, शरद गायकर आदी उपस्थित होते.



सौजन्य : अमित जाधव (जि. प. सदस्य), ज्ञानेश्वर पाटील

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मताले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com